# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** चिखली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0400 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/05/2025 00:52

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 26/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/05/2025
**Time From (वेळेपासून):** 17:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/05/2025 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/05/2025 00:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती चिखली,चिखली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौ.मिरा साहेबराव बोके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | येवता ,चिखली,चिखली,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | येवता ,चिखली,चिखली,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9325713025

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत | | | 1. जिजाऊ कान्व्हेन्टजवळ, राऊतवाडी, ,चिखली,चिखली, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No.<br>(अ.क्र.) | UIDB Number<br>(यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन चिखली दिनांक 26.05.2025 सौ.मिरा साहेबराव बोके, वय 30 वर्ष, व्यवसाय घरकाम, रा.येवता ता.चिखली, जि.बुलढाणा, मो. क्र.9325713025 समक्ष हजर येवुन टंकलिखीत फिर्याद देते की, मी वरिलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी आई वडीलांसोबत राहते. मी आज दिनांक 26.05.2025 रोजी एका लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरोकडे केली होती. त्यानुसार मला पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी फोनवर संपर्क करुन चिखली ते बुलढाणा रोडवरील सवणा फाटा येथे थांबून राहण्याबाबत सुचीत केले. त्यानुसार मी सवणा फाटा चिखली येथे हजर असतांना पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार हे एका वाहनाने कारवाई पथकासह हजर आले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार यांनी स्वतःचा तसेच सापळा पथकातील इतर कर्मचारी तसेच पंचांचा परीचय करुन दिला. पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार यांच्याकडे मी माझी लेखी तक्रार दिली की, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणाचे 20 टक्के/सेसफंड योजनेअंतर्गत सन 2024-25 या गट वर्षात मागासवर्गीय शेतकरी/महीला लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत शिलाई मशीन अनुदानाचा लाभ मिळण्यासाठी मी तिन ते चार महीन्यापुर्वी माझे स्वतःचे नावे पंचायत समीती चिखली येथे रितसर सर्व कागदपत्रे जोडुन अर्ज सादर केला होता. सदर अर्जाची छाननी श्री.राजपुत यांनी करुन जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा येथे पंचायत समीती चिखली मार्फत अर्ज पाठविण्यात आला होता. जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा यांचेकडुन शिलाई मशीन लाभार्थी यादीमध्ये माझे नाव आले होते. दिनांक 23.05.2025 रोजी पंचायत समीती कार्यालय चिखली येथुन लोकसेवक श्री.राजपुत साहेब यांनी फोनव्दारे कळविले की, तुम्ही केलेल्या शिलाई मशीन मिळणेबाबतचा अर्ज मंजुर झाला असुन मी तुम्हाला व्हाटसअॅपवर पाठवलेल्या स्थळ पाहणी फाॅर्मवर ग्रामसेवक, सरपंच यांची सही व शिक्का घेवुन मला येवुन भेटा असे कळविले. त्यावरुन मी आज दिनांक 26.05.2025 रोजी श्री.राजपुत यांनी पाठविलेल्या स्थळ पाहणी फाॅर्मवर ग्रामसेवक, सरपंच यांचा सही शिक्का घेवुन सदर फाॅर्म व इतर कागदपत्रासोबत पंचायत समीती कार्यालय चिखली येथे श्री.राजपुत साहेब यांना भेटुन दिले. तेव्हा त्यांनी मला, तुम्ही अनुदानासाठी पात्र झाल्याने तुमचे शिलाई मशीन खरेदी केल्याचे 12,000/- रुपयांच्या बिलाचा प्रस्ताव जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा येथे पाठविण्याचा मोबादला म्हणुन मला 2500/- रुपये दया असे म्हणुन मला लाचेची मागणी केली, अशा आशयाची लेखी तक्रार पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार यांचेकडे दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार यांनी माझी लेखी तक्रार हि पंचाना वाचावयास दिली तसेच माझेकडुन तोंडी कथन करुन घेतली त्यातील मजकुर सारखाच असल्याने पंच क्र.1 श्री.संदीप जाधव यांनी त्यावर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारुन दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब यांनी मला सोबत आणलेल्या वाहनात बसवून घेवून दोन्ही पंच व मला पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन सोबत आणलेल्या व्हाॅईस रेकाॅर्डर बाबत सविस्तर माहीती दिली. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. पडताळणी पुर्व पंचनामा कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार लोकसेवक श्री.राजपुत, पंचायत समीती कार्यालय चिखली यांची लाच मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी कार्यवाही करणे असल्याने पोनि पवार यांनी माझेकडे व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन देवुन मला, पंच क्र.1 श्री.संदीप जाधव यांचेसोबत एका मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय चिखली येथे 15.49 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र.1 श्री.जाधव असे पंचायत समीती कार्यालय चिखली येथे लोकसेवक श्री.राजपुत बसतात त्या खोलीत जावुन पाहीले असता सदर ठिकाणी लोकसेवक श्री.राजपुत हे हजर नव्हते तेव्हा मी माझे फोनवरुन लोकसेवक श्री.राजपुत यांना लाऊडस्पीकर चालु करुन आॅफीसला आले असल्याचे सांगीतले. तेव्हा लोकसेवक श्री.राजपुत यांनी आज तुमच्या जवळ जेवढे असतील तेवढे देवुन टाका, बाकीचे नंतर दया असे म्हटले त्यावर मी त्यांना माझेजवळ सध्या 1000 रुपये आहेत. असे म्हटले असता श्री.राजपुत यांनी 1000/- आज देवुन टाका, बाकीचे 1500/- रुपये उदया देवुन टाका असे

म्हणुन 2500/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम घेवुन येण्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही कार्यवाही पथकाजवळ परत आलो. त्यानंतर पंच क्र.1 श्री.जाधव व मी घडलेली हकिकत पोलीस निरीक्षक श्री.रमेश पवार तसेच पंच क्र.2 श्री.काळे व सापळा पथकास सांगीतली. त्यानंतर व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये माझे व लोकसेवक श्री. राजपुत यांचे रेकाॅर्ड झालेले संभाषण ऐकुन लोकसेवक श्री.राजपुत यांनी मला 2500/- रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले व त्यानंतर लोकसेवक श्री.राजपुत यांनी मला फोन करुन लाच रक्कम घेवुन पंचायत समीती चिखली येथे त्यांचे कार्यालयात येण्याचे सांगीतल्याने सदर प्रकरणात आजच सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब यांनी मला सोबत आणलेल्या वाहनात बसवुन घेवुन लोकसेवक श्री.राजपुत, पंचायत समीती चिखली यांना लाच म्हणून देण्यासाठी 2500/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील भारतीय चलनाच्या पाचशेह रुपये दराच्या 5 नोटा असे एकुण 2500/- रुपये हजर केले. पोनि श्री.पवार साहेब यांनी सापळा पथकातील सदस्यांचे मदतीने सदर नोंटाचे क्रमांक लिहुन घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब यांनी मला व पंचांना अॅन्थ्रासीन पावडर चे गुणधर्म व अॅल्ट्राव्हायलेट बॅटरीबाबत माहीती दिली. सोबत आणलेल्या वाहनातच सदर नोंटाना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रीया पुर्ण करुन, मला तसेच पंच क्र.1 श्री.संदीप जाधव यांना सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील एका सदस्याने लाचेची रक्कम मी सोबत आणलेल्या पर्समधील एका कप्प्यात खोलवर ठेवून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवार यांनी मला सापळा कार्यवाही संबधाने आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन मला व पंच क्र.1 श्री.संदीप जाधव यांना मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय चिखली येथे 17.02 वा. रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब तसेच सापळा पथक, व पंच क्र.2 श्री.काळे असे त्यांचे वाहनाने न्यायालयाचे समोर वाहन उभे करुन आमचे मागोमाग पंचायत समीती कार्यालय चिखली चे गेटजवळ येवुन पंचायत समीती चिखलीचे आवारात आले. पंचायत समीती चिखली कार्यालयाचे आवारात पश्चिम दिशेला असलेल्या इमारतीमध्ये समाज कल्याण विभाग लिहीलेल्या इमारत मधील उजव्या बाजुचे खोलीमध्ये श्री.राजपुत बसतात त्या खोलीचे आजुबाजुने सापळा पथक आपापले अस्तीत्व लपवुन थांबुन राहीले. अषा प्रकारे रितसर सापळा आयोजीत केला. त्यानंतर मी सोबत पंच क्र.1 श्री.जाधव असे सदर खोलीमध्ये जावुन लोकसेवक श्री.राजपुत यांची भेट घेतली, त्यांचेशी शिलाई मशीन अनुदानासंबधाने बोलणी केली. सदर बोलणी दरम्यान मी माझे पर्समधुन लाच रक्कम 2500/- रुपये उजव्या हाताने काढुन श्री.राजपुत यांचे समोर धरुन म्हणाले की, हे घ्या आता आपलं मशनीचा झालं, तेव्हा श्री.राजपुत यांनी, हं शिलाई मशीनचं, असे म्हणुन लाच रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे नेसते पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवुन घेतली. त्यानंतर मी त्यांचेशी कामासंबधी चर्चा करुन कार्यालयाचे बाहेर येवुन माझे खांदयावर लटकवलेली पर्स काढुन उजव्या हातात धरुन लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला असता त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.पवार साहेब, पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. राजपुत यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय 34 वर्षे, पद कनिष्ट सहायक, पंचायत समीती चिखली, जि.बुलढाणा, रा. साखरखेर्डा ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा, ह.मु.जिजाऊ काॅन्व्हेन्टजवळ, राऊतवाडी, चिखली, ता.चिखली जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तरी श्री.हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय 34 वर्षे,पद कनिष्ट सहायक, पंचायत समीती चिखली, जि.बुलढाणा रा.साखरखेर्डा ता. सिंदखेडराजा जि.बुलढाणा ह.मु.जिजाऊ काॅन्व्हेन्टजवळ, राऊतवाडी, चिखली, ता.चिखली जि.बुलढाणा यांनी दिनांक 26.05.2025 रोजी मी जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणाचे 20 टक्के/सेसफंड योजनेअंतर्गत सन 2024-25 या गट वर्षात स्वतःचे नावे शिलाई मशीनकरीता लाभ मिळण्यासाठी सादर केलेला मंजुर अर्जावरुन शिलाई मशीन खरेदी केल्याबाबतचे 12000/- रुपयांचे बिल जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा येथे पाठविण्याचा मोबादला म्हणुन मला 2500/- लाचेची मागणी करुन आज दिनांक 26.05.2025 रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, पद कनिष्ट सहायक, पंचायत समीती चिखली, जि.बुलढाणा यांनी त्यांचे समाज कल्याण विभाग पंचायत समीती चिखली येथील कार्यालयात 17.02 वा ते 17.15 वा दरम्यान पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारली. वरुन लोकसेवक श्री.हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय 34 वर्षे, पद कनिष्ट सहायक, पंचायत समीती चिखली, जि.बुलढाणा यांचेविरुध्द मी कायदेशीर फिर्याद देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sangram damodhar patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sangram damodhar

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**